PUBLICATION – PRABHAT
DATE – SEPTEMBER 15, 2011
PAGE NO - 5 (GOOD MORNING PUNE)

100% PUBLIC RELATIONS

# भारतातील औषधी वनस्पती उद्योगाला उज्ज्वल भविष्य - राघवेंद्र गायकैवारी

पुणे, दि. १४ - भारतातील औषधी वनस्पतीचा शास्त्रीय पद्धतीने वापर केल्यास या वनस्पतींच्या अर्कांना व त्यापासून तयार केलेल्या औषधांना देशात व परदेशात मोठ्या प्रमाणात बाजारपेठ उपलब्ध आहे, असे हायटेक बायो सायन्सेसचे अध्यक्ष राघवेंद्र गायकैवारी यांनी सांगितले.

हायटेक बायो सायन्सेस आणि ऑस्ट्रेलियातील नैसर्गिक आरोग्यपूरकांची निर्माती होलिस्टा कॉल टेक यांच्याबरोबर संयुक्त कंपनी स्थापन केल्याच्या करारावर स्वाक्षऱ्या झाल्यानंतर गायकैवारी यांनी ही माहिती दिली. यावेळी होलिस्टर कॉल टेकचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. एम. राजेन उपस्थित होते. गायकैवारी म्हणाले की, भारतातील पारंपरिक आयुर्वेदिक औषधे व वनस्पती कागदोपत्री न नोंदल्यामुळे तसेच वितरण व्यवस्थेतील अभावामुळे त्यांना परदेशात मान्यता मिळाली नाही. आम्ही त्या दृष्टिकोनातून प्रयत्न करून या औषधांना जागतिक पातळीवर मान्यता मिळवून देण्यासाठी व बाजारपेठ शोधण्यासाठी प्रयत्न करू. यावेळी राजेन म्हणाले की, होलिस्टा ही औषधे व हर्बल उत्पादने जगभरातील १७०० अधिक वितरण केंद्रातून वितरित करील.